# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोननं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- १२६-२२ दिनांक :- ०२/०५/२०२२

## वसई-आचोळे परिसरात गांजा व मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ बाळगणाऱ्या सराईत ईसमावर तसेच नायजेरीयन ईसमावर अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई

दिनांक ३०/०४/२०२२ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, वसई (पश्चिम), वसई कोळीवाडा या ठिकाणी रफिक नावाचा ईसम हा त्याचे रहाते घरातून अंमली पदार्थाची विक्री करीत आहे. मिळालेल्या बातमीप्रमाणे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन वसई कोळीवाडा येथील बिसमिल्ला बिल्डींग जवळ सापळा रचुन कारवाई केली असता सदर बिल्डींगमधील तिसऱ्या मजल्यावर राहणारा ईसम रफिक मोहम्मद अली शेख वय ४५ वर्षे, रा. बिस्मील्ला बिल्डींग, तिसरा माळा, कोळीवाडा, गौसीया मशिदीजवळ, वसई गांव, वसई (पश्चिम) ता. वसई, जि. पालघर याचे कब्ज्यात ७ ग्रॅम वजनाचा ७०,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असताना मिळुन आला असुन त्याचे घरझडतीमध्ये ७०२.४ ग्रॅम वजनाचा १०५००/रु. किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने नमुद अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. सदरबाबत वसई पोलीस ठाणे येथे गुरनं. १४४/२०२२ एनडीपीएस ॲक्टप्रमाणे दिनांक ०१/०५/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर आरोपीतास अटक करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे दिनांक ३०/०४/२०२२ रोजी आचोळे पोलीस ठाणे हद्दीत रात्री २१.२५ वा.चे सुमारास पेट्रोलिंग दरम्यान आचोळे तलावाजवळ रोहीत बिल्डर ॲन्ड डेव्हलपर्सचे ऑफिस समोरील फुटपाथवर परकीय नागरीक ईसम नामे ज्युड चिनये ओगा वय-३६ वर्षे, रा. प्रगती नगर, ९० फुटी रोड, नालासोपारा (पुर्व) मुळ रा. इमोस्टेट, देश-नायझेरीया याने स्वतःचे कब्ज्यात २४ ग्रॅम वजनाचा १,९२,०००/-रु. किंमतीचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असताना मिळुन आल्याने सदर आरोपीविरुध्द आचोळे पोलीस ठाणे येथे गुरनं २०५/२०२२ एनडीपीएस ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपीविरुध्द नायजेरियन नागरीक ज्युड चिनये ओगा याचेविरुध्द यापुर्वी तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ाा १७८/२०२१ एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८(क), २०, २२(क), २९ प्रमाणे गुन्हा दाखल असुन नमुद ईसम अंमली पदार्थ विक्री करणारा सराईत गुन्हेगार आहे. पुढील तपास आचोळे पोलीस ठाण्याकडुन चालु आहे.

वरील कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. देवीदास हंडोरे, सहा.पोलीस निरीक्षक श्री. विलास कुटे, पो.हवा. धनाजी इंगळे, पवन पाटील, प्रदीप टक्के, अजय सपकाळ, सुभाष आव्हाड, विष्णुदेव घरबुडे, पो.शि. अजय यादव यांनी केली आहे.

---ooo---